**<u>ठळक बातम्या</u>**

- विविध देशांबरोबरच्या व्यापार करारांमुळे तरुणांना देशात आणि विदेशात रोजगाराच्या संधी मिळणार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर होणाऱ्या संचलनाची तयारी संपन्न
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू प्रजासत्ताकदिनाच्या पूर्वसंध्येला देशाला संबोधित करणार
- पाचव्या वीर गाथा पुरस्कारांचं वितरण, राज्यातल्या १९ विद्यार्थ्यांचा समावेश

**आणि**

- उच्च न्यायालयांनी आणखी सक्रीय पद्धतीनं काम करावं, अशी अपेक्षा सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्याकडून व्यक्त

**<><><><><>**

तरुणांना देशात आणि विदेशात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून यासाठी विविध देशांशी व्यापार करार केले जात आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित अठराव्या रोजगार मेळाव्याला ते दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते. रोजगार मेळाव्याद्वारे आतापर्यंत लाखो युवांना विविध सरकारी विभागांमध्ये नियुक्ती मिळाली असून हे नियुक्तीपत्र तरुणांना विकसित भारताकडे घेऊन जाणारं संकल्पपत्र आहे, असं त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड बाईट मोदी - -**

या रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या ६१ हजार जणांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं. यात आठ हजार महिलांचा समावेश आहे. गृह विभाग, वित्त विभाग, महसूल विभाग, आरोग्य

विभाग, उच्च शिक्षण विभाग, संरक्षण विभाग आदी विभागात या नियुक्त्या होत आहेत.

गेल्या दहा वर्षांत भारताचं सकल देशांतर्गत उत्पादन दुपटीने वाढलं, जगभरातले शंभरपेक्षा अधिक देश भारतात थेट परकीय गुंतवणूक करत आहेत, त्यामुळे अगणित रोजगार निर्माण झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. देशात जवळपास दोन लाख नोंदणीकृत स्टार्टअप आहेत, यात २१ लाखापेक्षा जास्त युवा काम करत आहेत, असं त्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षांत नागरिकांची क्रयशक्ती वाढल्याचंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर येत्या सोमवारी होणाऱ्या संचलनातल्या सांस्कृतिक कार्यक्रमाची रंगीत तालीम आज झाली. सुमारे अडीच हजार कलाकारांनी त्यात भाग घेतला. वंदे मातरम् गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव हा संचलनाचा प्रमुख विषय आहे. एमएम कीरवाणी यांचं संगीत सुभाष सेहगल यांचं गीत आणि अभिनेता अनुपम खेर यांचं निवेदन या सांस्कृतिक कार्यक्रमाला लाभलं आहे. ज्येष्ठ नृत्यांगना संध्या पुरेचा यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष नायर यांनी नृत्य बसवली आहेत.

**<><><><>**

देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या मुख्य शासकीय समारंभाची रंगीत तालीम आज मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर झाली. राजशिष्टाचार विभागाच्या उपसचिव क्रांती पाटील यांनी ध्वजवंदन केलं. यावेळी झालेल्या संचलनात भारतीय नौदल, गोवा पोलीस, राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई पोलिसांचे विविध विभाग, मुंबई लोहमार्ग पोलीस दल, बृहन्मुंबई अग्निशमन दल, वाद्यपथक इत्यादींनी सहभाग घेतला. नौदलाचे कमांडर पंकज बघेल यांनी संचलनाचं नेतृत्व केलं. सर्वोत्कृष्ट संचलन पथकांना पारितोषिकं देऊन सन्मानित

करण्यात आलं. राज्य शासनाच्या विविध विभागांच्या चित्ररथांनीही या संचलनात भाग घेतला.

<><><><>

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, उद्या संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार आहेत. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरून रोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता  आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३० वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसेच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होणार आहे.

<><><><>

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सरकारी कार्यालयांची नावं येत्या सोमवारी प्रजासत्ताक दिन सोहळ्यात जाहीर करण्यात येतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत  विविध १० स्तरांवर शासकीय कार्यालयांचं मूल्यमापन संकेतस्थळ, ई ऑफिस, व्हॉट्सॲप चॅटबॉट, एआय ब्लॉक चेनचा वापर अशा विविध निकषांवर उतकृष्ट कार्य करणाऱ्या कार्यालयांचं मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे करण्यात येत आहे. त्यात सर्वोत्कृष्ट प्रत्येकी ५ जिल्हाधिकारी कार्यालयं, पोलीस अधीक्षक कार्यालयं, महानगरपालिका, ७ राज्यस्तरीय

आयुक्तालयं, संचालनालयं, मंडळं, महामंडळं, निमशासकीय, संस्था शासकीय कंपन्या इत्यादींची निवड केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे ही माहिती दिली आहे.

<><><><><>

शालेय विद्यार्थ्यांसाठी मानाचे पाचवे वीर गाथा पुरस्कार आज प्रदान करण्यात आले. यावर्षीच्या पुरस्कारप्राप्त विदयार्थ्यांमध्ये महाराष्ट्रातल्या १९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. १८ देशांमधल्या ९१ शाळांमधून विजेत्यांची निवड करण्यात आली. यावर्षी १ लाख ९२ हजार शाळांमधून सुमारे १ कोटी ९२ लाख विद्यार्थ्यांनी उपक्रमात भाग घेतला होता. विजेत्यांना १० हजार रुपये रोख तसंच विशेष अतिथी म्हणून कर्तव्य पथावर उपस्थित राहून प्रजासत्ताक दिनाचं संचलन पाहता येणार आहे. संरक्षण आणि शिक्षण मंत्रालयाकडून संयुक्तरित्या हा उपक्रम राबवला जातो.

<><><><><>

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित हिंद-दी-चादर कार्यक्रमात आज श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. मंत्री गिरीश महाजन, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर आणि शेकडो भाविकांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचं दर्शन घेतलं. भाविकांनी सकाळपासूनच शहरातल्या मोदी मैदानावर दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांनी चोख व्यवस्था केली आहे.

<><><><><>

उच्च न्यायालयं ही न्यायदानाच्या प्रक्रियेतले पहारेकरी आहेत, त्यांनी आणखी सक्रीय पद्धतीनं काम करावं, अशी अपेक्षा सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी आज व्यक्त केली. मुंबईत फली नरिमन स्मृती व्याख्यानात ते बोलत

होते. न्याय मिळण्यात उशीर होणं म्हणजे तो नाकारला जाणंच नाही, तर तो नष्ट होणं आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

न्यायाचं भविष्य, आपण किती चांगल्या प्रकारे न्यायनिवाडा करतो यावर नाही, तर किती हुशारीनं वाद सोडवतो, यावर अवलंबून आहे, असं मत न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी मुंबई उच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या सत्कार समारंभात मांडलं. मध्यस्थी, समेट आणि लवाद हे फक्त पर्याय नाही, तर न्यायप्रणालीची प्रभावी साधनं आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर आधारित शिक्षकांची पदं भरण्याच्या पद्धतीत बदल करणाऱ्या शासन निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली असून त्यावर न्यायालयाने राज्यशासनाकडून जबाब मागितला आहे. २००९च्या शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार पटसंख्येच्या प्रमाणात शिक्षकांची पदं भरली जात होती. मात्र १५ मार्च २०२४च्या शासन निर्णयानुसार त्यात बदल झाल्यामुळे अनेक वर्गांसाठी एकच शिक्षक राहील, आणि कमी पटसंख्येच्या अनेक शाळा बंद पडतील असा दावा सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण संस्था चालक मंडळाने दाखल केलेल्या याचिकेत केला आहे.

**<><><><>**

चंद्रपूर आणि लातूर महानगरपालिकेत सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरू असून दोन्ही ठिकाणी काँग्रेसचा महापौर होईल, असा विश्वास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला. चंद्रपूर महानगरपालिकेत काँग्रेस पक्षात कोणतेही मतभेद नाहीत, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, वंचित बहुजन आघाडी आणि इतर मित्रपक्षांनाही सोबत घेण्याचा प्रयत्न करत आहोत असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्री-प्रायमरी शाळांवर सरकारचं नियंत्रण आणण्याबाबत सरकार गांभीर्यानं विचार करत असून यासंदर्भातल्या कायद्याचा मसुदा अभ्यास गट तयार करत आहे, अशी माहिती शिक्षण राज्यमंत्री डॉक्टर पंकज भोयर यांनी आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना दिली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**